# ठाणेमहानगरपालिका, ठाणे

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
बेलापूर रोड, कळवा, ठाणे - ४००६०५
दूरध्वनी क्र. (०२२) २५३७२७७४ ते ७९


संदर्भ :- ठामपा/रागांवैम/छशिमरु/अधि. 9094 दिनांक 03/02/2026

विषय :- OBSTERICS AND GYNAECOLOGY Medical Officer (एकूण जागा ०८) यांची करारपध्दतीने एकत्रित ठोक मानधनावर १७९ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणे साठीची जाहिरात.

सन २०२५-२६ या वर्षात ठाणे महानगरपालिकेचे कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात OBSTERICS AND GYNAECOLOGY MEDICAL OFFICER (एकूण जागा ०८) या पदावर रु.१,५०,०००/- प्रति व्यक्ति, प्रति महा या एकत्रित ठोक मानधनावर १७९ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेकरीता जाहिरात देण्यात येत आहे.

वरील पदावर काम करणेकरीता स्वारस्य असलेल्या उमेदवारांनी दि.११/०२/२०२६ रोजी अधिष्ठाता कार्यालय, पहिला मजला, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय या ठिकाणी सकाळी ११.०० वा.थेट मुलाखतीसाठी (WALK – IN – INTERVIEW) उपस्थित रहावे.

## अटी व शर्ती

१. **उमेदवाराची शैक्षणिक अर्हता** :-MS/MD/DNB OBSTERICS AND GYNAECOLOGY WITH 2 YEARS EXPERIENCE VALID MMC REGISTRATION OR DGO ( CPS OR UNIVERSITY DIPLOMA) WITH 3 YEARS EXPERIENCE VALID MMC REGISTRATION.

२. नियुक्तीच्या अंमलबजावणी पासून १७९ दिवसांच्या कालावधीकरीता OBGY MEDICAL OFFICER यांची नियुक्ती करण्यात येईल.

३. OBGY MEDICAL OFFICER यांच्या दररोजचा कामाचा कालावधी ०८ तासांचा रोटेशन पध्दतीने राहील.

४. सदर OBGY MEDICAL OFFICER यांना महानगरपालिकेशी करारनामा करावा लागेल.

५. OBGY MEDICAL OFFICER जर काही कारणास्तव हजर राहू शकणार नसतील तर, त्याबाबत त्यांनी आगाऊ कळविणे बंधनकारक आहे.

६. OBGY MEDICAL OFFICER यांच्या कामाचा आढावा प्राध्यापक व विभागप्रमुख वैद्यकीय अधिक्षकांसह दररोज घेतील.

७. OBGY MEDICAL OFFICER यांस एक महिन्याची नोटिस देऊन राजीनामा देता येईल. तसेच रुग्णालयातर्फे एक महिन्याच्या नोटिसीने त्यांची सेवा खंडित करता येईल.

८. रुग्णाबाबत जर बेजबाबदार अथवा गैरवर्तन झाल्याचे निष्पन्न झाल्यास प्रशासनातर्फे त्यांची सेवा तडकाफडकी संपुष्टात आणली जाऊ शकते.

९. संबधित विभागाचे विभाग प्रमुखांकडून OBGY MEDICAL OFFICER विषयी तक्रारी आल्यास त्याची शहानिशा करुन संबधित प्रशासकीय/आर्थिक कारवाई करण्याचे अधिकार वैद्यकीयअधिक्षक/अधिष्ठाता यांना राहतील.

१०. रुग्णाच्या बाबतीत बेजबाबदारपणे वर्तणूक केल्याचा अहवाल विभागप्रमुखांनी दिल्यास, मानधन पूर्णत: किंवा अंशत: रोखून धरण्याचे/रद्द करण्याचे अधिकार वैद्यकीयअधिक्षक/अधिष्ठाता यांना राहतील.

03/02/26

( डॉ.स्वप्नाली कदम )
अधिष्ठात्री,
रागांवैम व छशिमरु (कळवा)